गुरुवार दि.२० मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१८५ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

## बेशिस्त नियम खपवून घेतले जाणार नाहीत

# अधिकारी अन् कर्मचाऱ्यांच्या रील्स टाकण्याच्या लक्षवेधीवर मुख्यमंत्री फडणवीसांचे उत्तर



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील अनेक अधिकारी आणि कर्मचारी सोशल मीडियावर रील्स तयार करून आपण काम करत असल्याचे भासवतात. आता अशा बेशिस्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सरकार नवीन जीआर काढणार आहे. बेशिस्त नियम खपवून घेतले जाणार नाहीत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आमदार परिणय फुके यांनी यासंदर्भात लक्षवेधी मांडली होती. त्यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सदरील माहिती दिली.आमदार परिणय फुके यांनी अधिकार आणि कर्मचाऱ्यांसंदर्भात विधानसभेत लक्षवेधी मांडली होती. अधिकारी आणि कर्मचारी वर्ग रिल्स टाकतात. यातून राज्य तेच चालवतात असा भास निर्माण करतात. यासंदर्भात कडक नियम आणि कारवाई करणे आवश्यक आहे, असे परिणय फुके म्हणाले होते. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपरोक्त उत्तर दिले.

आमदार परिणय फुके यांच्या लक्षवेधीवर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नियम तयार झाले तेव्हा सोशल मीडिया नव्हते. आपल्या ड्युटीला ग्लोरिफाय करण्याचा प्रयत्न अधिकारी देखील करतात. सिटिजन एन्गेजमेन्ट करण्यासाठी सोशल मीडियाचा वापर व्हावा. यासंदर्भात कडक नियम तयार करण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. सेवा शर्तीचे नियम आहेत १९८९ चे त्यात वेगवेगळ्या माध्यमांचा उपयोग आणि वर्तवणूकीसंदर्भात नवे नियम तयार करण्यात येतील असे मुख्यमंत्री म्हणाले. यासंदर्भात सविस्तर जीआर काढला जाणार आहे. बेशिस्त नियम खपवून घेतले जाणार नाही असे मी आश्वासित करतो असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.दरम्यान, यूपीएससीच्या धर्तीवर राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरती प्रक्रियेत देखील कॅलेंडर निश्चित केले जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली. एमपीएससीची परीक्षा या वर्षीपासून आपण डिस्क्रिप्टिव्ह स्वरूपात घेणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. यासाठी काही नागरिकांचा विरोध आहे. मात्र हा विरोध ग्राह्य धरणार नाही, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका देखील स्पष्ट केली आहे. लवकरच एमपीएससीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात भरती करणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

# मेघना कावली यांची नांदेड जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

नांदेड २०२० बॅसचच्या समाजशास्त्र हा विषय घेवून ८३ वी रॅंक घेवून आय.ए.एस. झालेल्या किनवटच्या विद्यमान सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांची शासनाने जिल्हा परिषद, नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती केली आहे.



मेघना कावली हया मुळच्या तेलंगणा राज्यातील मारपल्ली मंडल बशिराबाद जिल्हा विकराबाद येथील मुळ रहिवाशी असुन हैद्राबाद निवासी आहेत. त्यांचे वडील रामलू हे व्यवसायाने डॉक्टर आहेत तर आई सुजाता ह्या गृहणी आहेत. त्यांचे पती रविकुमार हे सुध्दा भारतीय प्रशासनिक अधिकारी (आय.ए.एस.) आहेत. मेघना कावली हया मुळच्या इंजिनिअर असून यांनी इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग मध्ये बि.टेक.पदवी संपादणूक केली असून आय.आय.एम.लखनौ येथून याच विषयात पदवीव्युत्तर एम.टेक. चे शिक्षण घेतलेले आहे. भारतीय प्रशासनिक सेवेत येण्यापूर्वी त्या सहाय्यक मार्केटिंग मॅनेजर आय.टी.सी.बंगलोर या पदावर कार्यरत होत्या. सध्या त्या किनवट येथे सहाय्यक जिल्हाधिकारी पदावर कार्यरत होत्या.

# नवा मोढा नांदेड येथे महाराष्ट्र शासन कृषी विभाग व रोटरी क्लब नांदेड यांच्या वतीने कृषी महोत्सव २०२५

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

उद्घाटन झाले. त्यावेळी नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले साहेब नांदेड जिल्ह्याचे पोलीस निरीक्षक आदरणीय अविनाश कुमार नांदेड जिल्ह्याचे जिल्हा कृषी अधीक्षक आदरणीय दत्तकुमार कळसाई सर नांदेड जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी एतवाडे सर व अनिल शिरपूरे अरुण घुमनवाड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय लहानकर सर्व तालुका कृषी अधिकारी उपस्थिती




त्यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले साहेब व सर्व मान्यवरांच्या हस्ते नैसर्गिक सेंद्रिय शेतीमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल शाल शिरफळ सन्मान पत्र देऊन सन्मान केला . आसन मन माझा नसून सेंद्रिय शेती करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा सन्मान आहे त्यामुळे शेतकरी नैसर्गिक सेंद्रिय शेतीकडे वळतील.

# पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांचा व्यसनमुक्तीचा स्तुत्य उपक्रम!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

मुखेड, ग्रामीण भागातील या दारूमुळे संसार लोकांचे देशी उद्धुस्त होत असून. अपघात होऊन मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. ही बाब लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक लक्ष्मणराव केंद्रे यांनी तालुक्यातील पोलिस परिक्षेत्रातील ३८ गावांत व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन करून तब्बल ५ हजारपेक्षा जास्त लोकांचे दारूचे व्यसन बंद केले आहे. या व्यसनमुक्ती कार्यक्रमातून खाकी वर्दीतील संवेदनशील मनाचा नागरिक पाहावयास मिळत आहे. पोलिस ठाण्यात दररोज २५ ते ३० नागरिक आपल्या आप्तेष्टांना दारूपासून मुक्ती मिळविण्यासाठी पोलिस ठाण्यात येऊन होमिओपॅथी औषध घेऊन जातात.मार्च



२०२४ मध्ये मुखेड पोलिस ठाण्यात रुजू झालेले पोलिस निरीक्षक केंद्रे यांनी प्रत्येक सोमवारी पोलिस पाटलांची बैठक घेऊन गावातील कायदा व सुव्यवस्था सक्षम करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. सोबतच गावागावांत अवैध दारू विक्री व व्यसनमुक्तीसाठी बैठक घेत आहेत. यावेळी सोबत एक डॉक्टर व पोलिसपाटील तसेच गावातील सरपंच

> **“ दारू सोडविण्यासाठी स्वदेशी अभियानाचे दिवंगत राजीव दीक्षित यांचे यु ट्यूबवरून व्हिडीओ पाहिले. दारू कशी सोडवायची याची माहिती घेऊन त्यांनी बर्दापूर येथे हा प्रयोग केला. त्यामुळे अनेक लोकांची व्यसनमुक्ती केली. मुखेड पोलिस ठाणे अंतर्गत विशेष मोहीम राबवून गावागावांतील अवैध देशी दारू विक्री बंद केली.**

व इतरांना बोलावून व्यसनमुक्तीसाठी समुपदेशन करतात. गावातील मद्यपींना पाण्यातून सल्फर २०० हे होमिओपॅथी औषधाचे थेंब टाकून व्यसनमुक्ती अभियान राबवीत आहेत.

पोलिस निरीक्षक केंद्रे यांनी २०१९ साली बीड जिल्ह्यातील पोलिस ठाणे बर्दापूर येथे पहिल्यांदा स्वखर्चाने होमिओपॅथी औषधी आणतात प्रत्येक महिन्याला पाच हजार रुपयांचे सल्फर २०० होमिओपॅथी औषधी नागपूरहून ठोक भावात मागवितात.मागेल त्याला मोफत औषधी पुरवितात. पोलिस ठाण्यात दररोज जिल्ह्यातून कंधार, नांदेड, नायगाव, देगलूर, सह जिल्हा बाहेरून उदगीर, लातूर, गंगाखेड, पुणे, छत्रपती संभाजी नगर, तेलंगणासह कर्नाटक राज्यातील लोकांचे नातेवाइक दारूची नशा सोडविण्यासाठी व औषधी घेण्यासाठी येतात.अवैध दारू विक्री बंद व अनेक लोकांनी दारू पिणे बंद केल्याने गुन्हेगारीचा आलेख कमी झाला आहे.

# नांदेड वारकरी मंडळाच्या जिल्हाध्यक्ष पदी गोपीनाथ महाराज केंद्रे यांची निवड




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

अखिल भाविक वारकरी मंडळाचे सर्वेसर्वा परम ह.भ.प सुधाकरजी महाराज इंगळे यांच्या आदेशाने व प्रदेशाध्यक्ष ह.भ.प जोतीराम चांगभले महाराज प्रदेश उपाध्यक्ष ह.भ.प भागवत महाराज चवरे यांच्या हस्ते अ.भा.वारकरी मंडळाच्या नांदेड जिल्हाध्यक्ष पदी संघटनेचे राज्यस्तरीय वारकरी संमेलनात सांगोला येथे निवड करण्यात आली,

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान आळंदीचे अध्यक्ष श्री निरंजननाथ योगीजी महाराज श्री संत नामदेव महाराजांचे वंशज श्री माधव महाराज नामदास पंढरपूरकर वासकर फडाचे प्रमुख श्री ह.भ.प गोपाळ अण्णा वासकर महाराज शिवसेना अध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांच्या उपस्थितीत निवड केल्याबद्दल सर्व मान्यवर महाराज मंडळींनी गोपीनाथ महाराज केंद्रे यांची नांदेड जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




**मा.श्री शिवानंद मिनगिरे साहेब,सहायक आयुक्त समाजकल्याण नांदेड ,यांची सदिच्छा भेट घेतल्या नंतर सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणा–या महाराष्ट्र तीर्थ दर्शन योजनेबद्दल व अनेक योजनेबद्दल साहेबांनी माहिती दिली. यावेळी उस्माननगर विभाग ग्रामीण मराठी पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष तथा दै.श्रमिक एकजूट चे उस्माननगर ( प्रतिनिधी ) लक्ष्मण कांबळे व सामाजिक कार्यकर्ते तथा उस्माननगर ग्रामपंचायत चे सदस्य शिवशंकर काळे याच्याकडून साहेबांचा यथोचित सत्कार करण्यात आला.(छाया – बाजीराव पाटील)**

# एम.जी.एम.कॉलेज च्या वतीने घेण्यात आलेल्या 'नॅशनल लेव्हल प्रोजेक्ट कॉम्पीटिशन' मध्ये सचिन गायकवाड व श्रीराम भांजे यांना पुरस्कार प्राप्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद पा.मोरे**

नांदेड येथील महात्मा गांधी मिशनच्या (एमजीएम) कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड आय.टी.महाविद्यालयामार्फत १८ मार्च २०२५ मंगळवार रोजी घेण्यात आलेल्या 'नॅशनल लेव्हल प्रोजेक्ट कॉम्पीटिशन' मध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.यामध्ये लाईफ सायन्स आणि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या विषयावर आधारित विषयावर विविध प्रोजेक्ट सादर करण्याची स्पर्धा महाविद्यालयामार्फत आयोजित करण्यात आलेली होती. त्यामध्ये महाविद्यालयातील एम.एस्सी बायोटेक्नॉलॉजी या वर्गातील विद्यार्थी



सचिन बाजीराव गायकवाड व श्रीराम उत्तमराव भांजे या दोन विद्यार्थ्यांनी 'इको–फ्रेंडली सिन्थेसीस ऑफ नॅनो–फर्टिलायझर' या विषयावर आधारित प्रोजेक्ट सादर केला होता व त्यावर उत्कृष्ट प्रदर्शन देले.त्यामुळे महाविद्यालयामार्फत त्यांचा तृतीय क्रमांक काढण्यात आला.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.कमलकिशोर कदम साहेब, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संचालिका डॉ.गीता लाटकर मॅडम, प्राचार्य डॉ. शिरीष एल. कोटगीरे, उपप्राचार्या डॉ. कांचन नांदेडकर मॅडम, बायोटेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ.धनंजय गोंड, बायोइन्फर्मेटिक्स विभाग प्रमुख डॉ. मकरंद चेरेकर,बी.सी.ए. विभाग प्रमुख डॉ. भोपी,आयक्यूएसी प्रमुख प्रा. विशाल पाठक,पदव्युत्तर समन्वयीका डॉ. मयुरी सरसर, प्रोजेक्ट कॉम्पीटिशनचे समन्वयक संतोष शिंदे, समन्वयक मुक्तार, एम.एस्सी द्वितीय वर्ष वर्गप्रमुख रक्षंदा करकरे यांनी अभिनंदन केले आहे.तसेच कळका नगरीचे भुमिपत्र मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती मारोतराव पाटील गायकवाड साहेब यांनी सचिन गायकवाड यांचे अभिनंदन करून पुढील भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.त्या दोघांचेही सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जामगाव येथील मयत धनु दामू रणसिंग या मागासवर्गीय युवकाच्या खुनाच्या घटनेमुळे समाजात मोठा आक्रोश पसरला

## मागासवर्गीय समाजाने तहसीलदार वैशाली पाटील मॅडम यांना निवेदन दिले असून,खून करणाऱ्या आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**







मयत:- धनू दामू रणसिंग मौजे जामगाव ता.आष्टी जिल्हा,बीड

आष्टी तालुक्यातील मागासवर्गीय युवक मयत धनु दामू रणसिंग यांच्या खुनाच्या प्रकरणात आरोपींना फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीसाठी मागासवर्गीय समाजाने तहसीलदार व पोलिस निरीक्षक यांना निवेदन दिले आहे.या निवेदनात विशेष खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवण्याची मागणी केली आहे,तसेच पीडित कुटुंबाला आर्थिक मदत व कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी देण्याची मागणीही करण्यात आली आहे.समाजातील धनु दामू रणसिंग या युवकाचा निर्दयीपणे खून झाला आहे.या दुर्दैवी घटनेने संपूर्ण समाज हळहळला आहे आणि यामुळे समाजामध्ये रोष निर्माण झाला आहे.मयत धनु दामू रणसिंग हा युवक अत्यंत सामान्य परिस्थितीतील होता आणि त्याच्या कुटुंबावर या घटनेमुळे मोठे संकट आले आहे.आरोपींनी केलेला हा क्रूरकर्म अक्षम्य असून, त्यांच्या या कृत्याला कठोर शिक्षा देण्यात यावी.

त्यामुळे आम्ही विनंती करतो की,धनु दामू रणसिंग यांच्या खुनाच्या आरोपींना फाशीची शिक्षा दिली जावी.तसेच या प्रकरणाचा जलदगतीने निकाल लागावा यासाठी विशेष न्यायालयाची स्थापन करून तातडीने निर्णय होईल अशी व्यवस्था करावी.या निवेदनादरम्यान उपस्थित असलेल्या व्यक्तींमध्ये भारतीय जनता पार्टीचे (अनुसूचित जाती मोर्चा) प्रदेश उपाध्यक्ष अनिलजी चांदणे,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य लालासाहेब शिंदे,माजी जिल्हा परिषद सदस्य मा.नवनाथ आप्पा चखाले,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा शो.वि.सं.आष्टी तालुका अध्यक्ष मा.नेताजी 'जालिंदर' गायकवाड,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते भगवानराव भोसले,युवा नेते तथा माजी सरपंच रमेश शिरोळे 'कडा', ग्रा.सदस्य संतोष भाऊ रणसिंग,शोषित विकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग खवळे पाटील,लहुजी शक्ती सेनेचे आष्टी तालुका अध्यक्ष संदीपभाऊ वाल्हेकर,डि.पी.आय तालुका अध्यक्ष संतोषभाऊ साठे,युवा सामाजिक कार्यकर्ते नागेश भाऊ डाडर,बीड ता.अध्यक्ष बबन वाघमारे,मा.बाल आनंद गायकवाड महाराज,मा.गोकुळ वाल्हेकर आकाश वाल्हेकर इतर सर्व मागासवर्गीय समाजबांधव आणि मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# जिजाऊ ज्ञानमंदिर स्कूल ग्लोबल एज्यूकेशन अवार्ड २०२५ने सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

मुखेड,सन २०१० पासून कार्यरत असलेल्या जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूल ने मुखेड शहरातच नव्हे तर पंचक्रोशीत आपल्या शैक्षणिक कार्याचा व निकालाचा चढता आलेख ठेवत एक वेगळा ठसा उमटवला आहे. गेल्या १५ वर्षापासून शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी व प्राचार्य तथा सचिव जगदीप जोगदंड यांनी केलेले शैक्षणिक कार्य सर्वांचे आकर्षण असून सर्वांगसुंदर निसर्गशाळा म्हणून जिजाऊ ज्ञानमंदिर ही शाळा सर्वार्थाने देखणी तर आहेच पण येथील विद्यार्थी गुणवंत ,यशवंत प्रगतीशील आहेत. जे की आपल्या बुद्धिमतेच्या बळावर बेसिक नॉलेज घेवून खखढ इंजिनिअर , डॉक्टर , क्लासवन अधिकारी पदापर्यंत पोहंचून यशस्वीपणे विविध कार्यक्षेत्रात कार्यरत आहेत. यशस्वी विद्यार्थी हेच या शाळेची खरी कमाई आहे. प्रामाणिक प्रयत्न व धडपड करून शैक्षणिक कार्याबरोबरच आपल्या विद्यार्थ्यामध्ये नैतिक जीवनमुल्ये रुजवून सुसंस्कारीत विद्यार्थी घडविणारी शाळा म्हणून जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूल च्या कार्याची दखल घेवून महाराष्ट्र , कर्नाटक व गोवा राज्यात सक्रीय कार्यरत असलेल्या आधार सोशल फाऊंडेशन बेळगाव च्या वतीने रविवारी १६ मार्च २०२५ रोजी ट्रीया हॉटेल हॉल , स्टेशन रोड , ताराबाई पार्क , टनाटन हॉटेल जवळ कोल्हापूर येथे सन्मानपूर्वक



भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गडहिंग्लज शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन तथा सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. पांडूरंग पाटील , सेवानिवृत आयएएस अधिकारी शंभु कृष्णा कल्लोळकर , असिस्टंट डॉयरेक्टर सोशल वेलफेअर डीपार्टमेंट चिकोडीच्या अर्चना एस. साने मॅडम , सेवानिवृत्त प्रादेशिक परिवहन अधिकारी सांगलीचे डॉ. दुर्गाप्पा पवार, न्युरो हॅपीनेस कोच मुंबईच्या डॉ. अर्चना कोयले मॅडम, कोल्हापूरचे सुप्रसिद्ध प्रवचनकार हभप डॉ. एस.पी. पाटील, बालाजी पॅकेजिंग कंपनी सांगलीचे यशस्वी उद्योजक डॉ. प्रशांत पाटील , कांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे सातारा येथील वंशज डॉ. दिलीप नेवसे , संजय गोडवत , नितीन जाधव, वैशाली मोरे, बँक व्यवस्थापक श्रीनिवास नवले , डॉ. निलेश चौगुले, प्रकाश धनगर, संपादक बाबासाहेब जाधव, आधार सोशल फौंडेशन चे अध्यक्ष डॉ. विक्रम शिंगाडे, प्रिती मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. 'जगी जीवनाचे सार , घ्यावे जानूनी सत्वर ,

**जैसे ज्याचे कर्म तैसे ,**
**फळ देतो रे ईश्वर ॥**

या उक्तीप्रमाणे महाराष्ट्र , कर्नाटक , गोवा राज्यात विविध कार्यक्षेत्रात उल्लेखनिय काम करणाऱ्या संस्था , व्यक्तीविशेषांना आधार सोशल फौंडेशन बेळगाव यांच्यावतीने शाल, श्रीफळ , सन्मानचिन्ह , सन्मानपत्र देऊन विशेष मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक गौरविण्यात आले. याचवेळी जिजाऊ ज्ञानमंदिर मुखेड ला ग्लोबल एज्यूकेशन अवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी ८९ वर्षाच्या मातोश्री कौतुकबाई जोगदंड , संस्थाध्यक्ष ज्ञानोबा जोगदंड सर सौ. शकुंतला जोगदंड , प्राचार्य जगदीप जोगदंड सौ. शितल जोगदंड यांनी हा पुरस्कार सन्मानपूर्वक स्वीकारला. संस्थाध्यक्ष ज्ञानोबा जोगदंड हे कवी असल्याने त्यांना उत्कृष्ट कवी म्हणून ही गौरविण्यात आले. कोषाध्यक्ष जगदीश जोगदंड यांची शाळेविषयी असलेली तळमळ , दुरदृष्टी व पालकांचा शाळेविषयी असलेला विश्वास , पर्यवेक्षक सुधाकर जोगदंड यांच्या सुनियोजित मार्गदर्शना खाली विद्यार्थ्यांची निरंतर मेहनत यामुळेच हा पुरस्कार सर्वांच्या परिश्रमाचे फळ आहे. याबद्दल सर्वत्र शाळेचे कौतुक होत आहे.

# महागाव न.प.च्या अध्यक्षांनी केला अर्थसंकल्प सादर !

## शहरातील विकास कामांना चालना मिळेल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागांव । विजय थोरात**

महागाव नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ सुनंदा दिलीपराव कोपरकर यांनी २०२५ / २६ चा नुकताच अर्थसंकल्प सादर केला. सादर केलेल्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली. शहरातील सर्व विकासात्मक कामांना या अर्थसंकल्पामुळे चालना मिळणार आहे .



मुद्रांक शुल्क अनुदान, फर्निचर खरेदी निविदा फॉर्म विक्री, नगरपंचायत सहाय्यक अनुदान, जनगणना अनुदान, गाडे भाडे, इमारत भाडे, उपभोक्ता शुल्क, इमारत बांधकाम परवाना, फ्री दाखला, जन्ममृत्यू दाखला फी, नक्कल फी, विधी, वित्ती, अभियांत्रिकी, पाणी तपासणी सर्वसाधारण जाहिरात खर्च योजनांची प्रसिद्धी खर्च, बँक आकार इमारत देखभाल व दुरुस्ती नवीन गटारी दुरुस्ती, नगरपरिषद रस्ते व फुटपाथ दुरुस्ती, पंप मोटार डेकबल व दुरुस्ती, स्ट्रीट लाईट दुरुस्ती करणे, संगणक देखभाल व दुरुस्ती, वातानुकूलित यंत्र देखभाल व दुरुस्ती, पंधरावा वित्त आयोग , इतर प्राधिकरण कडून प्राणी खरेदी , उपभोग्य वस्तूंची खरेदी, जनगणना खर्च, गौरव आणि कार्य, अग्निशामक शुल्क, रोजदारी कर्मचारी, कर्मचारी आणि मानधन, अग्निशामक वाहन दुरुस्ती, जंतुनाशक खरेदी , ब्लिचिंग औषधीखरेदी ,मनुष्यबळपुरवठा, अनुसूचित जाती व नवबौद्ध घरकुल योजना, अनुदान जमीन खरेदी ,नवीन पाईपलाईन टाकणे, घनकचरा व्यवस्थापन व इतर वाहनाद्वारे कचरा संकलन करणे, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम, वाहन खरेदी संगणक व कार्यालयीन यंत्रसामग्री, गटार नाल्याचे बांधकाम, सिमेंट कॉंक्रीटय रस्ते, निविदा आनामत , सिमेंटचे रस्ते, वृक्ष कर, विद्युत कर, विशेष पाणी कर, आरोग्यकर, नगर पंचायत बांधकाम कर, माहिती अधिकार, रस्त्यावरील दिवे, वाढीव पाणीपुरवठा खर्च, कर्मचारी वर्ग मानधन, संगणक प्रिंटर्स यूपीएस व इतर साहित्य दुरुस्ती, जेसीबी भाडे व पुरवठा करणे, अक्रूर्षक सारा व नजुलभाडे शुल्क, नवीन कर आकारणी, वाचनालय बांधकाम जागा भाडेपट्टी, रद्दी भंगार विक्री, बँक व्याज, पुतळा उभारणी, पोलीस बंदोबस्त, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान सर्वेअर प्लॅनर परवाना फी, विवाह नोंदणी, इमारत बांधकाम विकास शुल्क, हस्तांतरण इतर कारणामुळे झालेले नुकसान, नगरपरिषद निधी, वेतन राखीव निधी, पाणीपुरवठा निधी, महिला व बालकल्याण निधी, तीन टक्के मागासवर्गीय निधी, अपंग कल्याण निधी, पंतप्रधान आवास योजना, रस्ता अनुदान, दलित वस्ती सुधार योजना, खासदार निधी, आमदार निधी, स्वच्छ भारत अभियान, सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान योजना, अल्पसंख्यांक अनुदान , सुवर्ण जयंती महाअभियान राज्यस्तर , नागरी सुविधा सहाय्य योजना, वैशिष्ट्यपूर्ण योजना, सुरक्षा अनामत ,शिक्षण कर , ना परतावा , ठेवी पगार ,एकत्रित वैद्यकीय प्रतिपूर्ती ,सिटी कॉर्डिनेटर मानधन, स्ट्रीट लाईट, विद्युत बिल, जाहिरात, खर्च छपाई, पाणीपट्टी, प्रवास भत्ता इत्यादी कामाबाबत आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित बजेटची तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने महागाव नगरपंचायत ची प्रशासकीय इमारत व पाण्याची सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने वेणी धरणातून प्रस्तावित करण्यात आलेली पाणीपुरवठा योजना व घनकचरा व्यवस्थापन या कामास प्राधान्य देणार असल्याची माहिती नगराध्यक्ष सौ . सुनंदा दिलीपराव कोपरकर यांनी दिली आहे. महागाव नगरपंचायत चा २०२५/२६ चा अर्थसंकल्प सादर करतांना उपनगराध्यक्ष तथा पाणीपुरवठा सभापती प्रमोद भरवाडे, महिला व बालकल्याण सभापती रूपाली कोल्हेकर, बांधकाम सभापती विशाल पांडे आणि आरोग्य सभापती गजानन साबळे , महागाव नगरपंचायत चे प्रभारी मुख्याधिकारी महेश कुमार जामनोर , लेखापाल महेश खिराडे यांच्या सह सर्व सन्माननीय नगरसेवक, नगरसेविकांनी अर्थसंकल्प सादर करतांना शहराच्या विकासाच्या दृष्टीने सहकार्य केले.

## रामराज्यात श्रीराम देवस्थानाची जमीन सुरक्षित नाही

# मौजे चकलांबा ग्रामपंचायतीच्या अतिक्रमणाचा प्रश्न आ.विजयसिंह पंडित यांनी सभागृहात मांडला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**

अतिक्रमण दूर करण्याचे काम ग्रामपंचायत करते मात्र चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमीनीवर अतिक्रमण करून कचरा डेपोचे काम सुरु केले आहे. महायुतीच्या काळात 'रामराज्य' सुरु असल्याचे लोक सांगतात मात्र या रामराज्यात श्रीराम देवस्थानाची जमीन सुरक्षित नाही अशी खंत आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत व्यक्त केली. गेवराई तालुक्यात सुरु असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामांची चौकशी करण्यासाठी एसआयटी नेमण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत सहभागी होताना आ.विजयसिंह पंडित विधानसभेत बोलत होते. जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेतील गैरव्यवहार आणि चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमीनीवर केलेले कचरा डेपोचे अतिक्रमण या दोन विषयाला आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत वाचा फोडली. यावेळी बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, जलजीवन मिशन अंतर्गत गेवराई तालुक्यातील १९२ गावांसाठी १७२ कोटी रुपये किंमतीच्या १७७ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे मंजुर आहेत. विहित मुदतीत एकाही योजनेचे काम पूर्ण झालेले नाही. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु होत आहेत. १९२ गावांपैकी १०% गावात सुध्दा सुरळीत पाणीपुरवठा होत नाही. वॅपकॉस प्रा. लि. सारख्या तांत्रिक सेवा पुरवठादार कंपनी आणि संबंधित विभागातील अधिकारी यांच्या संगणमताने शासनाचा कोट्यावधी रुपयांचा निधी अक्षरशः वाया गेला आहे. प्रगती कन्स्ट्रक्शन सारख्या कंत्राटदाराने कोट्यावधी रुपयांची देयके उचलून



पोबारा केला आहे. त्यामुळे या सर्व योजनांच्या कामाची चौकशी करण्यासाठी एसआयटी गठीत करण्याची मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी केली.मौजे चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमीनीवर केलेल्या अतिक्रमणाबाबत बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, घनकचरा व्यवस्थापनासाठी चकलांबा ग्रामपंचायतीला निधी मंजुर झाला. मात्र या ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान या नोंदणीकृत ट्रस्ट मालकीच्या गट क्र.५७१ मधील जमीनीवर कचरा डेपोचे काम सुरु केले आहे. या ग्रामपंचायतीचा कारभार याच सरकारमधील क्लास वन अधिकारी हाकत आहेत. 'अधिकारी-अधिकारी' अशी मिलीभगत सुरु असल्यामुळे आता श्रीराम सुध्दा चकलांबा सारख्या गावात सुरक्षित नाहीत. महायुतीच्या काळात रामराज्य सुरु असल्याचे काही लोक सांगतात मात्र याच सरकारच्या काळात श्रीराम देवस्थानाची जमीन आपण वाचवू शकतो का ? असा सवालही आ. विजयसिंह पंडित यांनी उपस्थित केला.चकलांबा ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती खेडकर यांच्या कार्यकाळात श्रीराम देवस्थानाच्या जमीनीवर अतिक्रमण होत असल्याची तक्रार पवन लाहोटी यांनी केली होती. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक राजेंद्र मोराळे यांनी हे काम स्थगित करण्याऐवजी देवस्थानच्या जागेत अतिक्रमण आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना गटविकास अधिकारी यांना लेखी पत्राद्वारे केल्या आहेत. कागदी घोडे नाचवून प्रकल्प संचालक राजेंद्र मोराळे हे चकलांबा ग्रामपंचायतीच्या सरपंच खेडकर यांना पाठिशी घालत आहेत का ? असा सवाल चकलांबा ग्रामस्थ विचारत आहेत.

# प्रधानमंत्री पिक विमा तक्रार निवारण समितीची सभा संपन्न

## विमा प्रतिनिधीला शेतकऱ्यांनी धरले धारेवर,एप्रिलमध्ये निर्णयाची शक्यता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोरपना । प्रदिप मडावी**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत अद्याप विमा रक्कम न मिळाल्याने ३ मार्च २०२५ रोजी राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने यांनी शेतकऱ्यांसमवेत तालुका कृषी अधिकारी यांना प्रधान मंत्री पिक विमा तक्रार निवारण समितीची बैठकीत बैठक आयोजित करण्यासंदर्भात निवेदन सादर केले होते.

त्याअनुषंगाने सोमवारी (दि. १७ मार्च) तहसील कार्यालयातील सभागृहात तहसीलदार पल्लवी आखरे यांच्या अध्यक्षतेखाली निवारण बैठक पार पडली. या बैठकीस प्रमुख उपस्थिती म्हणून तालुका कृषी अधिकारी पायघन,माजी जिल्हा परिषद सदस्य विजय पिदुरकर, भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने,शेतकरी प्रतिनिधी अबिद अली यांच्यासह कृषी विभाग आणि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे तालुका प्रतिनिधी उपस्थित होते.सदर बैठकीमध्ये सन २०२३-२४ मध्ये कोरपना तालुक्यातील शेतकऱ्यांना एकूण २२ कोटी १७ लक्ष रुपये वितरित करण्यात आले ,असून १६२ शेतकऱ्यांचे ८ लक्ष रुपये प्रलंबित आहे यामध्ये अनेक तांत्रिक कारणे असून सदर कारणे शेतकऱ्यांना लवकरात लवकर कळवले जाईल असे बैठकीत तालुका



कृषी अधिकारी यांनी सांगितले. २०२४-२५ या वर्षांसाठी कोरपना तालुक्यातील १९१५५ शेतकऱ्यांनी पिक विमा काढला असून,८९९३शेतकऱ्यांनी पीक विम्याच्या तक्रारी केल्या होत्या, त्यामध्ये ६२६२ शेतकऱ्यांच्या तक्रारी पात्र केल्या असून २७३० शेतकऱ्यांच्या तक्रारी त्रुटीमुळे अपात्र करण्यात आल्या. पीक विमा रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने शेतकऱ्यांनी आक्रोश व्यक्त केला. तसेच बैठकीत उपस्थित असलेल्या तालुका प्रतिनिधीकडे परिपूर्ण माहिती नसल्यामुळे शेतकऱ्यांनी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीच्या तालुका प्रतिनिधीला धारेवर धरले. तसेच तसेच विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे असमाधानकारक उत्तरे दिल्यामुळे शेतकरी अधिकच संतापले. कंपनीच्या प्रतिनिधींनी या संदर्भात संपूर्ण आराखडा तयार केला जात असून, एप्रिल महिन्यात पुन्हा निवारण बैठक घेऊन समस्या सोडवली जाईल, असे आश्वासन दिले.शेतकऱ्यांच्या मागण्या आणि विमा प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यावर भर देत प्रशासनाने लक्ष घालण्याची गरज असल्याचे मत शेतकरी व प्रतिनिधींनी व्यक्त केले.

# आज पासून स्वयंभू सत्य गणपती येथे अखंड हरिनाम सप्ताह

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

**अखंड हरिनाम सप्ताहातील किर्तनकार वेळ रात्री ७ ते ९ राहिल**

- ह.भ.प विष्णुपंत महाराज चिद्रवार साधकाश्रम आळंदी देवाची दि.२० मार्च गुरुवार
- ह.भ.प प्रा.शाम महाराज नेरकर परळी वैजनाथ दि.२१ मार्च शुक्रवार,
- ह.भ.प सतीश महाराज कंधारकर विठ्ठल रुक्मिणी मंदिर पुजारी,पंढरपूर दि.२२ मार्च शनिवार,
- ह.भ.प भास्कर ज्ञानेश्वर साधू महाराज (कंधार) उमरखेड,दि.२३ मार्च रविवार,
- ह.भ.प डॉ.चिदंबर किसन महाराज साखरे साधकाश्रम आळंदी देवाची दि.२४ मार्च सोमवार,
- ह.भ.प डॉ.चिदंबर किसन महाराज साखरे साधकाश्रम आळंदी देवाची दि.२५ मार्च मंगळवार,
- ह.भ.प डॉ.यशोधन किसन महाराज साखरे साधकाश्रम आळंदी देवाची दि.२६ मार्च बुधवार,
- काल्याचे किर्तनकार ह.भ.प डॉ.यशोधन किसन महाराज साखरे साधकाश्रम आळंदी देवाची
- दि.२७ मार्च गुरुवार,यांची उपस्थिती राहणार आहे.



महाजन यांच्या शेतातील शिवेवरील स्वयंभू सत्य गणपती घोडज रोड कंधार,येथे अखंड हरिनाम सप्ताह्याचा प्रारंभ दि.२० मार्च ते २७ मार्च गुरुवार पर्यत आयोजित केले आहे.व कलशारोहण सोहळ्याचे आयोजन दि.२६ मार्च रोज बुधवार सकाळी ९:०० नंतर करण्यात येणार आहे. तरील कंधार पंचक्रोशीतील भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त महाजन परिवार व स्वयंभु सत्य गणपती भक्त,कंधार वतीने करण्यात आले आहे,सप्ताह्याचा प्रारंभ फाल्गुन कृ.६ दि.२० मार्च रोज गुरुवार पासून अखंड हरिनाम सप्ताहस प्रारंभ होणार आहे.तसेच सांगता फाल्गुन कृ.१२ दि.२७ मार्च गुरुवार पर्यत आयोजित केला आहे.

काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाने या सप्ताहाचा सांगता होणार आहे.तसेच कंधार तालूक्यातील पंचक्रोशीतील भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताह कमिटीच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.या सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रमांची रूपरेषा पुढील प्रमाणे आहे,सकाळी ६:०० ते ८:०० काकडा आरती व भजन,स.८:३० ते ९:०० विष्णुसहस्वनाम स ९:०० ग्रंथराज ज्ञानेश्वरी व साधुसुधा पारायण, संध्याकाळी.६:०० ते ७:०० हरिपाठ, तसेच संध्याकाळी ७:०० ते ९:०० किर्तन आयोजन करण्यात आले आहे,या सप्ताहात कंधार तालुक्यांतील पंचक्रोशितील भजनी मंडळ उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमांचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावा असे आव्हान समस्त महाजन परिवार व स्वयंभु सत्य गणपती भक्त, कंधार ता.कंधार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीड रेल्वे जंक्शनसाठी खा.सोनवणेंची तळमळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

दिल्ली येथे लोकसभेचे अधिवेशन सुरू असून दि.१७ मार्च रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वेबजेट वर बोलताना आभ्यासपूर्ण व मुद्देसूद मांडणी केली.यावेळी ते म्हणाले,बीड जिल्हा हा अजूनही रेल्वेसेवेपासून वंचित राहिलेला एक मोठा जिल्हा आहे.सततच्या मागणीला प्रतिसाद देत उस्मानाबाद (धाराशिव)- बीड- औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) हा महत्वाचा रेल्वेमार्ग अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी देण्यात आला असून,या कामाला गती देण्याची गरज आहे.या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा करत असताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद दिला.त्यांनी या रेल्वेमार्गाच्या अंतिम स्थान सर्वेक्षणास मान्यता देत सहा कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करून या खासदारांच्या महत्वाकांक्षी प्रकल्पास प्रतिसाद दिलेला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास दक्षिण भारतातील कन्याकुमारी,चेन्नई, हैदराबाद,तिरुपती या महत्वाच्या शहरांना उत्तर भारतातील दिल्ली, अयोध्या,काशी तसेच श्रीनगरपर्यंत जोडणारा सर्वात कमी अंतराचा आणि वेळ आणि खर्च वाचविणारा महत्वाचा वर्दळीचा मार्ग ठरेल.हा प्रकल्प मराठवाड्यातील,विशेषतः बीड जिल्ह्याच्या नागरिकांसाठी विकासाचा राजमार्ग ठरेल.यामुळे औद्योगिक विकास,व्यापार, रोजगार आणि शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतील.

अहिल्यानगर-परळी रेल्वेमार्गाचे काम गतीने सुरू आहे.तर उस्मानाबाद (धाराशिव)- बीड- औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) हा महत्वाचा रेल्वेमार्ग अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी देण्यात आला असून,या कामाला गती देण्यासाठी दोन हजार कोटींची आर्थिक तरतूद करावी,अशी तळमळीने अभ्यासपुर्ण मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी काल रेल्वे बजेटवर बोलताना केली.

# साल गाड्यांसाठी सुरू आहे गावोगावी शोधाशोध

## मजुरांच्या वाढलेल्या अपेक्षांमुळे शेतकरी हैराण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । माधव नागलवाड**

गुढीपाढवा आला की शेतकरी आपल्या शेतात काम करण्यासाठी सालगडयांचा शोध घेत असतात यासाठी गुढीपाडव्याच्या १५ते२० दिवस आगोदरपासूनच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची सालगडयांचा शोधासाठी धावपळ सुरु असते. परंतू यंदा सालगडयांचा भाव दिड लाखावर व साह मन धान्य असे आशा मागण्या आसुन तरी शेतकरयाला सांगडे मिळवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे हे असे म्हणने खोटे ठरणार नाही .व बरेच शेतकरी नातेवाईकांच्या गावी जाऊन सालगडयासाठी विचारपूस करावी लागत आहे.तर मोबाईल वर संपर्क करून पाव्हण सालगडी मिळेल का हो ? अशी भावणीक साद घालत आहेत. गुढीपाडवा जवळ आला तरी सालगडी मिळत नसल्यामुळे व त्यांचे मागण्यात वाढ झाली त्यातच आजची तरुण पिढी शेती व्यवसायापासून दुर राहत आसल्यामळे आगामीकाळात शेतीव्यवसाय करणे तारेवरची कसरत होईल असे म्हणणे वावगे ठरणार नाही.असे चित्र राज्याच्या विवीध ग्रामीण भागात दिसून येत आहे. शेती मोठ्या प्रमाणात निसर्गाच्या लहरीपनावर अवलंबून आहे गेल्या काही वर्षांपासून शेतीव्यवसाय करणे आव्हान झाले आहे.पाउस एकदम कमी पढणे नाहीतर आतीवष्टी होत आहे. त्यात खरीप व रबी हंगामातील पिक काढणीला आले की आतिवृष्टिने नासाडी होत आहे हे तितकेच खरे आहे हे नाकरता येत नाही. सालगडी म्हणुन गुंतून रहाण्यापेक्षा आनेख जन बांधकाम, विठभटी, उसतोडणी ,मंदिर बांधकाम,बार आणी हॉटेलमध्ये कामगार म्हणुन जातात येथे आधीक कमाई होत आसल्यामळे ग्रामीण भागातील शेतमजूर शहराकडे वळाले आहेत.त्यामुळे सालगडी मिळणे सध्या शेतकऱ्यांसमोरील एक मोठे आव्हान ठरत आहे सालगडी मिळत नसल्याने शेतकरी आपली शेती बटाईने देण्यावर भर देत आहेत या वर्षात गुढीपाढवा जवळ आला तरी सालगडी मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभे टाकले आहे आनेक शेतकरी सालगडयांचा शोधात भटकत आहेत. शेतीतुन मिळणारे उत्पन्न कमी आणी खर्च आधीक यामुळेच शेतकरी दुहेरी आडचणीत सापडला आहे. यंदा सालगड्याचा पगार एकलाख ते दिड लाखापर्यंत गेला आहे.भोकर तालुक्यातील बर्याच गावामधे स्थानिक पातळीवर मिळत नसल्यामुळेच इतर तालुक्यातून शोधाशोध करुन सालगडी आणण्याचे काम शेतकऱ्यां समोरील एक मोठे आव्हान आहे.

# केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्ली च्या बुलढाणा जिल्हा अध्यक्षपदी डॉ.डी.व्ही.खरात सर यांची नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गोळेगाव । प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्यातील बोदवड शेजारील श्री. गजानन महाराज संस्थान मंदीराच्या, सुंदर सुवासिक फुलझाडे व वेलींनी बहरलेल्या मनोवेधक परिसरात संपन्न झालेल्या केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्ली च्या दि.१५-०३-२०२५ च्या प्रादेशिक अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये संगठनचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉ. मिलिंद दहिवले यांनी, बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील सुप्रसिध्द कवी व सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा समर्पित मानवीय कार्यासाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. डी. व्ही. खरात सर, चिखली, जि. बुलढाणा यांना केंद्रीय मानवाधिकार संगठन चे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष म्हणून सन्मानाने नियुक्ती पत्र देऊन त्यांचा व त्यांच्या योगदानाचाही सत्कार करण्यात आला. हा त्यांचा गौरव, संगठनचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा ज्येष्ठ वकील तसेच साहित्यिक, कवी, दिग्दर्शक, हरहुन्नरी कलाकार आणि विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय तथा अंतर्राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त



डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली, उपाध्यक्ष तथा मुंबई प्रांतातील संगठनचे लोकप्रिय कार्यकर्ते जनाब बशीर शेख, महाराष्ट्र राज्य पदाधिकारी डॉ. पंकज इंगळे, जळगाव आणि डॉ. अमरकुमार तायडे, राष्ट्रीय संघटन सचिव डॉ. बबनराव महामुने, छत्रपती संभाजीनगर तसेच आपल्या चिरंतन सामाजिक कार्यामुळे सबंध खानदेशात प्रसिद्ध असलेले व नुकतेच संगठनचे महाराष्ट्र राज्य विशेष उपाध्यक्षपदी नियुक्ती मिळालेले मा. रविंद्र काशिनाथ सोनार, गोळेगाव यांच्या हस्ते तथा प्रमुख उपस्थितीत, नियुक्ती पत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. डॉ. खरात यांना आतापर्यंत महाराष्ट्र राज्याच्या समाज कल्याण विभागाच्या सौजन्याने प्रदान झालेल्या राज्यस्तरीय पुरस्कारासह अनेक राज्यांतील साहित्यिक व इतर विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले असून संविधान सन्मान परिषद, महाराष्ट्र राज्य तर्फे सुध्दा संविधान सन्मान पुरस्कार जाहीर झाला असल्याने देशभरातून नागरिकांच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

# आरक्षण सोडत कार्यक्रमाचे मंगळवारी आयोजन : तहसीलदार वैशाली पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यातील आगामी ग्राम पंचायत निवडणुकीसाठी सरपंचपदाचे आरक्षण सोडत कार्यक्रमाचे आयोजन आष्टी तहसील कार्यालयामध्ये मंगळवार दि.२५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आष्टीच्या तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांनी केले आहे.



याविषयी अधिक माहिती देताना त्यांनी दि.१७मार्च रोजी प्रेस नोट जारी केली आहे.त्यामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्र शासन ग्रामीण विकास विभाग,बीड जिल्हाधिकारी कार्यालय यांचे निर्देशाप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच नियम १९६४ मधील नियम ३ (अ) प्रमाणे तालुक्यातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी,समांतर प्रवर्गासाठी आगामी पाच वर्षाकरिता सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी गठीत होणाऱ्या ग्रामपंचायती करता सरपंचपदासाठी सोडत पद्धतीने आरक्षण कार्यक्रम दि.२५ मार्च सकाळी ११ वा.आष्टी तहसील कार्यालय सभागृहाम ध्ये आयोजित करण्यात आला आहे. आष्टी तालुक्यातील आगामी १२५ ग्रामपंचायत सरपंचपदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम याम ध्ये जाहीर होणार आहे.यावेळी उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

# कामेश्वरी माता यात्रेनिमित्त कुस्तीचे सामने संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरा । शेख खमरूद्दीन जिलानी**

कांजाळा ता लोहा जि नांदेड येथे कामेश्वरी माता यात्रेनिमित्त गावकऱ्यांच्या वतीने प्रमपरेनुसार दि.१८ मार्च २०२५ मंगळवार रोजी जंगी कुस्तीचे सामने मोठ्या उत्साहात पार पडले संपूर्ण गावकरी मढळनी चागल्या प्रकारे सहकार्य करून कामेश्वरी माता यात्रेची शोभा वाढविली.यात्रा शांततेत पार पडली.

# नाभिक सखी सन्मान पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहावे-शहराध्यक्ष अक्षय जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड जिल्ह्याच्या वतीने नाभिक समाजातील कर्तृत्वान महिला तसेच सामाजिक, राजकीय शैक्षणिक ,आदर्श माता अशा विविध अंगाने उत्कृष्ट कार्य असणाऱ्या नाभिक समाजातील भगिनींचा नाभिक सखी सन्मान पुरस्कार सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रम चे आयोजन दिनांक २१/३/२०२५ वार शुक्रवार सकाळी ११.३० रोजी जनशिक्षण संस्था चक्रधर नगर बीड या ठिकाणी पुरस्काराच्या वितरणाचा कार्यक्रम ठेवला आहे.या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी मुख्य



आकर्षण सौ अंजली धानोरकर उपजिल्हाधिकारी संभाजीनगर बीड यांची उपस्थिती असणार यांच्या शुभहस्ते या पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व समाज बांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र नाभिक महामंडळ शहर अध्यक्ष अक्षय जाधव यांनी केले आहे.

# कैलास गोरठेकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा; चाहत्याकडून शुभेच्छांचा वर्षाव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरी । महेश पडोळे

नायगाव मतदार संघाचे राष्ट्रवादी काग्रेस पक्षाचे युवा नेतृत्व तथा नादेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक कैलासभाऊ बापुसाहेब देशमुख गोरठेकर याच्या वाढदिवसनिमित विविध राजकीय पक्ष मित्रमंडळी यांच्यावतीने शुभेच्छाचा वर्षाव करुन आभिष्टचिंतन केले. यावेळी उमरी शहरात विविध उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आलादि १६मार्च रविवारी रोजी कैलासभाऊ गोरठेकर यानी
गोरठा येथे दासगणु महाराज समाधीचे दर्शन,कै बाबासाहेब देशमुख व कै बापुसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या समाधीचे दर्शन, सव्वा आठ वाजता सावरगाव रोडवरील कृष्ण मदीर येथे दर्शन, महादेव मदीराचे दर्शन,बाबा महाराज समाधीचे दर्शन, साईबाबा मदीर येथे कैलासभाऊ याच्या हस्ते आरती,चौक गल्ली येथील दत मदीरात दर्शन, राम मदीर येथे दर्शन,विठ्ठल मुक्कावार सावकार किराणा दुकान येथे आभिष्टचितन सोहळा,माता महाकाली मदीर येथे दर्शन व कैलासभाऊ गोरठेकर मित्र मडळ देवी गल्ली यांच्या तर्फे वाढदिवस साजरा ,छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मोढा उमरी येथे, सतोष नामेवार यांच्या वतीने वाढदिवस साजरा करण्यात आला तसेच, उमरी ग्रामिण रुग्णालय येथे रुगणाना फळ वाटप करण्यात आले ,योगेश्वर प्रिटीग प्रेस येथे



वाढदिवस साजरा ,साईबाबा अमृतुल्य गुळाचा चहा हाटेलचे उदघाटन, भोकर रोड रेल्वे गेटजवळ कैलासभाऊ गौरठेकर आर ओ पाणपोईचे उदघाटन,कोहीनुर टाकीज येथे सय्यद चाद सेठ यांच्या वतीने सत्कार, यशवत हायस्कुल ज्यु कालेज, व कै बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालयात वाढदिवस साजरा केला . मामा चौक येथे सत सेवालाल ट्रेडर्स याच्या वतीने आभिष्टचितन,व खिचडी वाटप, डा असोशिएन च्या वतीने डा खानसोळे यांच्या हास्पीटल मध्ये सत्कार, सदीप चदनवार यांच्या मेडिकल समोर पाणपोईचे उदघाटन,कळकटवाड याचे हाटेल तुलसी बार व रेस्टॉरंट निमटेक येथे उदघाटन, गोळेगाव येथे कारेगाव फाटा येथेकैलासभाऊ गोरठेकर मित्र मडाळाच्या वतीने वाढदिवस,शहाजी पाटील गाढे सरपंच बळेगाव यांच्या वतीने वाढदिवस,सिधी येथे कैलासभाऊ मित्र मडळाच्या वतीने छावा चित्रपट व वाढदिवस साजर हणमत पाटील कुदळेकर याच्या माऊली दुध डेअरी येथे कैलासभाऊ गोरठेकर यांचा वाढदिवस साजरा असे विविध उपक्रम राबवून कैलासभाऊ गोरठेकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

# 'आई-बाप समजून घेताना' या विषयावर डॉ.वसंत हंकारे यांच्या व्याख्यानाचे नविन मोंढा नांदेड येथे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव पाटील

नांदेड शहरातील व्हि.पी.के.पतसंस्था नवीन मोंढा नांदेड यांच्या वतीने आणि चेअरमन मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या सौजन्याने दि.२० मार्च २०२५ गुरूवार रोजी सायंकाळी ४ ते ९ वाजेपर्यत एक ऐतिहासिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध वक्ते मा. डॉ.वसंत हंकारे आई–बाप समजून घेताना या विषयावर हृदयस्पर्शी व्याख्यान देतील. कार्यक्रमामध्ये किशोरवयीन मुला–मुलींना आई–वडिलांबद्दलच्या भावनिक आणि वास्तवदर्शी नात्याचा अनमोल विचार




सांगितला जाणार आहे. पालक आणि मुले यांच्या नात्यातील समजूतदारपणा वाढवण्यासाठी हे व्याख्यान अत्यंत महत्त्वाचे ठरेल.कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण:
हृदयस्पर्शी व्याख्यान – मा. डॉ.वसंत हंकारे देशभक्तीपर संगीत संमेलन – सौ. रागिनी जोशी, आदर्श पुरस्कार वितरण – विविध क्षेत्रातील उल्लेखनीय व्यक्तींचा सन्मान अनाथ मुलांना शालेय साहित्य वाटप – सामाजिक बांधिलकीचे प्रतीक कार्यक्रमाबद्दल माहिती देताना व्हि.पी.के.उद्योग समुहाचे चेअरमन मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी सांगितले की, हा कार्यक्रम परिवर्तन घडवणारा असून प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांसह उपस्थित राहावे. हा कार्यक्रम डोळ्यात अश्रू आणणारा आणि जिल्ह्याच्या शैक्षणिक व सामाजिक प्रबोधनासाठी मोलाचा ठरणार असल्याचे नमूद केले.
नांदेड जिल्ह्यातील विविध समाजातील नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींना संयोजक म्हणून नेमण्यात आले आहे. गावपातळीवर सरपंच, ग्रामसेवक, पोलिस पाटील यांना निवेदन देण्यात येणार असून, अधिकाधिक किशोरवयीन मुला–मुलींना या कार्यक्रमात सहभागी करून घेण्यासाठी वाहतूक व्यवस्था करण्याची विनंती करण्यात आली आहे.अशी माहिती आमच्या प्रतिनिधींशी बोलताना कवळें गुरुजी यांनी दिली आहे.



मा. केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे साहेब यांना वाढदिवसाच्या विविध क्षेत्रातून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी मा. जी. प. सदस्य विठ्ठल चिंचपुरे, भा. जनता पार्टीचे ता. उपाध्यक्ष भगवान खाकरे, तसेच कैलास भाऊ हजारे, डॉक्टर पाडळे साहेब, सरपंच नितीन देवकर, उपसरपंच रामकृष्ण पा. सुसर, ईश्वर पाटील बोराडे, निवृत्ती शिरसाट, समाधान राऊत उपस्थित होते, (छाया लोकनेता न्यूज नेटवर्क)

## खरीप हंगाम २०२४ मध्ये शेती पिकाच्या नुकसानीसाठी

# ई-केवायसी २५ मार्च पर्यंत करुन घ्यावी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

निलंगा । इस्माईल महेबूब शेख

खरीप हंगाम २०२४ मध्ये माहे जून ते आक्टोबर २०२४ या कालावधीत लातूर जिल्हयात अतिवृष्टीने झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाकडून ४६६ कोटी ४० लाख इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी वाटपाची कार्यवाही डीबीटी प्रणालीमार्फत सुरु आहे. आजपर्यंत जिल्ह्यातील ३ लाख ८६ हजार ५०५ लाभार्थी मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले असून त्यापैकी ३ लाख ५० हजार ३७३ लाभार्थ्यांना ३८७ कोटी ३४ लाख रुपये निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच २४ हजार ३८२ शेतकऱ्यांनी अद्याप ई–केवायसी न केल्याने रक्कम २१ कोटी ७७ लाख रुपये इतका निधी वितरीत करणे शिल्लक आहे.




लातूर जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयामार्फत ई–केवायसी प्रलंबित असलेल्या शेतक–यांची गावनिहाय यादी संबंधित गावच्या ग्रामपंचायतीचे ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच याबाबत दवंडी व वर्तमानपत्रात प्रसिद्धी देऊन शेतकऱ्यांना ईकेवायसी पूर्ण करणेबाबत आवाहन करण्यात आले आहे. तरी ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ई–केवायसी केलेली नाही, अशा शेतकऱ्यांनी संबंधित तहसील कार्यालय किंवा ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे संपर्क साधून व्हीके नंबर प्राप्त करुन घेऊन नजीकचे आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सुविधा केंद्र (सीएससी) येथे जाऊन ई–केवायसी २५ मार्च २०२५ पूर्वी पूर्ण करुन घ्यावी. संबंधित शेतकरी यांनी ई–केवायसी पूर्ण केल्यानंतरच शासनाकडून डीबीटीपर्यंत शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात मदतीची रक्कम जमा होणार आहे.तरी जे शेतकरी मदतीसाठी पात्र आहेत व अद्याप पर्यंत ई–केवायसी केलेली नाही, अशा शेतकऱ्यांनी मुदतीत ई–केवायसी करुन घेण्याचे आवाहन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामाफत करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण सूचना; व्ही.पी.के उद्योग समूहाचा गाळप हंगाम २०२४-२०२५ संपणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव पाटील

व्ही.पी.के उद्योग समूहाच्या अंतर्गत येणाऱ्या एम.व्ही.के आणि व्ही.पी.के व डॉ.शंकरराव चव्हाण जागरी या उस गाळप कारखान्यांच्या कार्यक्षेत्र आणि उमरी, धर्माबाद, नायगाव, भोकर आणि नांदेड, हदगांव, हिमायतनगर, कंधार, मुखेड, बिलोली तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना कळवण्यात येत आहे की, गाळप हंगाम २०२४–२०२५ दि.२३ मार्च २०२५ च्या दरम्यान गाळप हंगाम संपत आलेला आहे, आणि त्यामुळे सध्या चालू असलेला व्ही.पी.के कारखाना व्यवस्थापनाने हंगामाची समाप्तीपूर्वी गाळप बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.
व्ही.पी.के उद्योग समूहाने २०२४–२०२५च्या गाळप हंगामाची अंतिम मुदत २३ मार्च २०२५ ठरवली आहे. या कारणास्तव, २२ मार्च २०२५ पर्यंत उसाचा गाळप संपविण्याची आवश्यकता



आहे. शेतकऱ्यांना सूचित करण्यात येत आहे की, त्यांच्या शेतातील उसाचा गाळप २३ मार्चपूर्वी पूर्ण होईल याची काळजी घ्यावी. ज्या शेतकऱ्यांचा उस शिल्लक आहे त्यांनी कारखान्याशी संपर्क साधून त्यांच्या उसाची माहिती द्यावी.शेतकऱ्यांना कळवण्यात येत आहे की, २२ मार्च २०२५ पर्यंत शेतकऱ्यांनी त्यांचा राहिलेला उस गाळपासाठी कारखान्याशी संपर्क साधून, आपला शिल्लक उसाचे गाळप कारखान्यापर्यंत पोहोचवावे अन्यथा, शिल्लक उसाची जबाबदारी कारखान्यावर राहणार नाही. यामुळे शेतकऱ्यांनी लक्ष देऊन, वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन कारखान्याच्या प्रशासनाने केले आहे.व्ही.पी.के उद्योग समूहाचे कार्यक्षेत्र उमरी, धर्माबाद, नायगाव, भोकर आणि नांदेड, हदगांव, हिमायतनगर, कंधार, मुखेड, बिलोली तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील उसाचे गाळप कार्य पूर्ण करण्यासाठी, योग्य वेळेत कारखान्याशी संपर्क साधावा, अन्यथा शिल्लक उसाची जबादारी ही स्वतःची राहील याची नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांना रोहित पवार यांनी राजशिष्टाचार शिकवू नये-संतोष रायकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले

कर्जत जामखेड विधानसभेचे आमदार श्री रोहित पवार हे नेहमीच आपल्या वक्तव्याने चर्चेत असतात ज्यांनाच राजशिष्टाचार काय असतो हे अजून समजलेले नाही. त्यांनी राम शिंदे साहेबांच्या बद्दल राज शिष्टाचार संदर्भात बोलावे हा विनोदच आहे..रोहित पवार हे विधानसभेच्या निवडणुकीपासून जनतेमध्ये नसून लोक त्यांना आता विचारत नाही या मानसिक ते मुळे रोहित पवार यांचे मानसिक संतुलन बिघडले असल्याचे भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव श्री संतोष रायकर यांनी म्हटले आहे. मागील झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये अतिशय थोडक्यात फरकाने रोहित पवार यांचा विजय झाला हा त्यांच्या जिव्हारी लागला आहे. राम शिंदे साहेब यांचा विधानसभेला पराभव होऊनही महाराष्ट्राच्या सर्वात मोठ्या संविधानिक पदावर जाऊन बसल्यामुळे तालुक्यातील सर्वसामान्य जनता राम शिंदे साहेबांकडे अशाने पाहतायेत हे रोहित पवारांना पाहवत नसल्याने त्यांनी अशा प्रकारचे बेताल वक्तव्य सुरू केले आहे.
मागील विधानसभेच्या निवडणुकीमध्ये रोहित पवार यांनी कोणत्या भाषेचा प्रयोग संपूर्ण निवडणुकीमध्ये केला हे जनता विसरलेले नाही.
याउलट प्रा राम शिंदे साहेब हे चारित्र्यसंपन्न गुणी व्यक्तिमत्त्व आहे सर्वसामान्य माणसाची जाण असणारे व सर्वसामान्य घरातील माणूस



विधानपरिषद सभापती पदापर्यंत पोहोचला हेच या पवारांना मान्य नाही शिंदे साहेब सर्वसामान्य माणसाला जवळ करणारे सर्वांना आपले वाटणारे नेतृत्व असल्या कारणाने मतदार संघातील अनेक प्रश्नांना दिशा देण्याचे काम व ते सोडवण्याचं काम शिंदे साहेब यांच्या माध्यमातून होत आहे.यापूर्वी राम शिंदे साहेबांनी आमदार महाराष्ट्र राज्याचे मंत्री आणि आता विधानसभेचे सभापती म्हणून जे कामाला गती दिलेली आहे ते सर्वसामान्य माणूस विसरू शकत नाही. आता राम शिंदे साहेबांशिवाय पर्याय नाही आपल्या मतदारसंघातील प्रश्न हे फक्त राम शिंदे साहेबच सोडू शकतात. हे जनतेच्या लक्षात आल्याने शिंदे साहेबांकडे पाहण्याचा दृष्टिकोन लोकांचा वाढला आहे. हेच रोहित पवार यांना खूपत असल्याने शिंदे साहेबावर काही बोलावे म्हणून अशा प्रकारचे वक्तव्य करून आपण कसे आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु जनतेने आपल्याला नाकारले आहे हे आता त्यांच्या लक्षात येत आहे रोहित पवारांचे आशा प्रकारे वक्तव्य म्हणजे रोहित पवारांच्या बुद्धीचा बालीश पणा आहे . विधान परिषदेचे सभापती हे सभागृहामध्ये सर्व पक्ष असतात आणि सभागृहाच्या बाहेर त्यांना त्यांच्या मनानुसार काम करता येते हे रोहित पवारांना माहीत नसून त्यांनी अगोदर राज शिष्टाचार समजून घ्यावा आणि नंतर बोलावे रोहित पवार यांनी विधान परिषद सभापती पदाचा अवमान केला आहे.अशा प्रकारचे बेताल वक्तव्य रोहित पवार यांनी करू नये असे भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव संतोष रायकर यांनी म्हटले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904